॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# North Maharashtra University, Jalgaon

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

जळगाव दि. 8 ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची पीएच.डी प्रवेशपूर्व परीक्षा उत्तीर्ण व प्रवेशपूर्व परीक्षेतून सुट प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शक निश्चितीच्या प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून 21 ते 25 मे दरम्यान ही प्रक्रिया होणार असल्याची माहिती प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर यांनी दिली.

विद्यापीठाची पीएच.डी प्रवेशपूर्व परीक्षा सप्टेंबर, 2017 मध्ये घेण्यात आली होती. या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या तसेच त्या परीक्षेतून सुट मिळालेले विद्यार्थी आणि 2014 मध्ये पीएच.डी प्रवेशपूर्व परीक्षा उत्तीर्ण झालेल्या परंतू मार्गदर्शक न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी ही मार्गदर्शक निश्चितीची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर मार्गदर्शकांची विषयनिहाय यादी आणि त्यांच्याकडे रिक्त असलेल्या जागांची माहीती देण्यात आली आहे. विद्यार्थी व मार्गदर्शकांनी संकेतस्थळावर दिलेले परिपत्रक काळजीपूर्वक वाचणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या विषयाच्या मार्गदर्शकाशी संपर्क साधून दिलेल्या नमून्याप्रमाणे मार्गदर्शकाचे संमतीपत्र भरुन घेणे आवश्यक आहे. मार्गदर्शकाचे संमतीपत्र तसेच परिपत्रकात नमूद केलेली सर्व मुळ कागदपत्रे व या कागदपत्रांच्या छायांकित प्रतींचा एक संच प्रक्रियेच्या दिवशी सोबत ठेवणे आवश्यक आहे. कागदपत्रांची पूर्तता न करणाऱ्या विद्यार्थ्यांना या प्रक्रियेत सामावून घेतले जाणार नाही.

ज्या उत्तीर्ण अथवा सुट प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शकाचे संमतीपत्र मिळाले नसेल त्या विद्यार्थ्यांना ऑगस्ट , 2018 मध्ये पीएच.डी प्रवेशपूर्व परीक्षा झाल्यानंतर रिक्त होणाऱ्या जागांच्या प्रक्रियेत पुन्हा सहभागी होता येणार आहे. ज्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक निश्चित होतील त्यांच्या कोर्सवर्कचे आयोजन पुढील महिन्यात केले जाणार आहे.

विद्याशाखानिहाय मार्गदर्शक निश्चितीचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे. ही प्रक्रिया नमूद केलेल्या तारखेस सकाळी 10 वाजता सुरु होणार आहे.- **विज्ञान व तंत्रज्ञान** (अभियांत्रिकीचे सर्व विषय नॅनो टेक्नॉलॉजीसह, फार्मसी) दि.21मे, 2018, यु.आय.सी.टी. विभागात, **आंतरविद्याशाखेतील** शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षण, जनसंवाद व पत्रकारिता, विधी या विषयांसाठी दि.23 मे रोजी शिक्षणशास्त्र विभागात तर डॉ.आंबेडकर विचारधारा आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयासाठी याच दिवशी ग्रंथालयात प्रक्रिया होईल. **मानव्यविद्याशाखा-** मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू आणि संस्कृत या विषयांसाठी 21 मे रोजी भाषा प्रशाळा आणि संशोधन केंद्र येथे तर दिनांक 22 मे रोजी समाजशास्त्र, समाजकार्य, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, अर्थशास्त्र, संरक्षण व सामरिक शास्त्र, इतिहास, तत्त्वज्ञान आणि विधी या विषयांसाठी सामाजिकशास्त्रे प्रशाळा या विभागात ही प्रक्रिया होईल. **वाणिज्य आणि व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखा -** वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र या विषयांसाठी दिनांक 25 मे रोजी व्यवस्थापनशास्त्र प्रशाळा येथे, गणित व संख्याशास्त्र या विषयांसाठी 24 मे रोजी गणितशास्त्र प्रशाळा, कॉम्प्युटर सायन्स व इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी या विषयासाठी 24 मे रोजी संगणकशास्त्र प्रशाळा, भौतिकशास्त्र आणि इलेक्ट्रॉनिक्स या विषयासाठी 23 मे रोजी भौतिकीयशास्त्र प्रशाळा, केमिस्ट्री सर्व विषय 22 मे रोजी रसायनशास्त्र प्रशाळा, भुगोल, पर्यावरणशास्त्र आणि भूगर्भशास्त्र या विषयांसाठी 21 मे रोजी पर्यावरणशास्त्र प्रशाळा येथे तर मायक्रोबायोलॉजी, बायोकेमिस्ट्री, बायोटेक्नॉलॉजी, बॉटनी आणि झुलॉजी या विषयांसाठी 21 मे रोजी जैवशास्त्र प्रशाळा येथे प्रक्रीया होणार आहे.

---

जा.क्र. : उमवि/16/हस्तदेय/2018 — दिनांक : 8 मे, 2018

प्रति,

मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
( डॉ.सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी